## महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

## महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या (मेस्को)

## "रायगड", दुसरा मजला, राष्ट्रीय युध्द स्मारका समोर
## घोरपडी, पुणे - ४११ ००१

# प्रस्तावना

१. सैन्यदलातील (भूदल, नौदल व वायुदल) निवृत्त होणाऱ्या सैनिकांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना निवृत्तीनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता विविध कल्याणकारी योजना राज्यआणि केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. अशा सेवानिवृत्त, अपंग सैनिक किंवा युध्दात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, याकरिता देखील काही योजना आखण्यात आलेल्या आहेत. या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करण्याकरिता, माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आणि कल्याणाकरिता एक महामंडळ स्थापन करावे, असा विचार १९८२ पासून शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार महाराष्ट्रात माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी योजना राबविण्यासाठी माहाराष्ट्र शासन निर्णय क्र. मासैम-१०१९/२३९०/प्र.क्र. २४४/९९/२८ दि. १८ जानेवारी, २००२ व्दारा महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या (Maharashtra Ex-Servicemen Corporation Ltd - MESCO) ची स्थापना करण्यात आली. सुरवातीला सुरक्षा सेवा क्षेत्रात पदार्पण करून आजपर्यंत सुमारे १०,००० माजी सैनिकांना त्यांच्या आपआपल्या गावांजवळ कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या उपलब्ध केलेल्या आहेत. तसेच यामहामंडळाचे इतर क्षेत्रांमध्ये, जसेकी संगणक प्रशिक्षण, वेगवेगळे करियर प्रशिक्षण, पेट्रोलपंप चालविणे, प्रिंटिंगप्रेस इ. उल्लेखनीय प्रगति केलेली आहे. आता तर या महामंडळाने पिंपरी-चिंचवड एम. आय. डी. सी. मध्ये जमीन खरेदी करून त्यावर ऑटो-इंजिनिअरींग उद्योग समुह स्थापन केला असून त्यासाठीच्या महासैनिक औद्योगिक वसाहतीच्या इमारतीचे काम आता पुर्ण झाले आहे. या व्यावसायिक प्रयत्नांतून जवळपास १००० माजी सैनिकांना अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच भविष्यामध्ये केंद्र शासनाच्या सहकार्याने कॉमन फॅसिलीटी सेंटर (CFC) सुरू करण्यात येणार असून त्यामध्ये माजी सैनिक/शहीदांच्या/विकलांग सैनिकांच्या पाल्यांना औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येणार आहे.

२. व्यापारी तत्वावर हे विविध व्यवसाय चालवितांना प्रत्येक व्यवसायासाठी लागू असणाऱ्या कायद्यांचे, अधिनियमांचे, शासकीय परिपत्रके, अधिसूचना इ. चे हे महामंडळ काटेकोरपणे पालन करते. तसेच या मळामंडळाद्वारे नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांना कायद्याप्रमाणे लागू असणारे वेतन व इतर फायदे नियमीतपणे अदा केले जातात. यामध्ये दिरंगाई अथवा कोणत्याही प्रकारची चूक होत असल्यास त्याची दाद मागण्यासाठी कोणाशी संपर्क साधावा अथवा तक्रार करावी याची माहिती सर्व संबंधिताना देणे आवश्यक आहे. यासाठी हि मेस्कोची **"नागरिकांची सनद"** प्रसिध्द / अद्ययावत करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

३. आपेक्षा हिच आहे की कोणत्याही कर्मचाऱ्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होता कामा नये. यास्तव सर्वांचे सहकार्य असणे अनिवार्य आहे.

**प्रमोद यादव,** भाप्रसे
**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.**

## भाग १

## महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाची संक्षिप्त माहिती

### महामंडळाची स्थापना

१. महाराष्ट्रातील माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने **"महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या"** (Maharashtra Ex-Servicemen Corporation Ltd - MESCO) शासन निर्णय क्र. मासैम-१०१९/२३९०/प्र.क्र. २४४/९९/२८ दि. १८ जानेवारी, २००२ अन्वये स्थापन केले.

### मेस्कोची ठळक उद्दीष्टे

२. या महामंडळाची ठळक उद्दीष्टे खालील प्रमाणे आहेत :-

(क) माजी सैनिकांना सरकारी, निम-सरकारी, शासकीय महामंडळे व प्राधिकरण व खाजगी विभागामध्ये सुरक्षा क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध करून देणे. त्यासाठी महामंडळाच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन मध्ये या कलमाचा अंतर्भाव करणे.

(ख) माजी सैनिकांसाठी स्वंयरोजगाराच्या योजना आखणे, तयार करणे, त्यासाठी आर्थिक मदत मिळवून देणे तसेच उद्योग धंदा सुरू करणे, व्यापार, वाणिज्यिक व सेवा उद्योगाची स्थापना करणे, त्यांचे प्रचलन करणे, इत्यादीबाबत माजी सैनिकांना मार्गदर्शन व मदत करणे.

(ग) माजी सैनिकांच्या रोजगार आणि पुन:स्थापना योजना सुरू करणे, त्यांचे प्रचलन करणे, प्रायोजन करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे.

(घ) माजी सैनिकांचे कल्याण व पुन:स्थापना करण्याच्या दृष्टीने व्यवसायाची उभारणी करणे, तसेच उत्पादन खरेदी-विक्री, विनिमयन, उभारणी , व्यवसायाबद्दल सुधारणा इ. उपक्रम सुरू करणे तसेच उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देणे, विविध प्रकारचे, उद्योग, यंत्र सामुग्री, निखळ सामुग्री आणि उपकरणे, कच्चा माल इत्यादी भाडेतत्वावर मिळवून देणे, त्या बाबत सहाय्य करणे.

(ड) माजी सैनिकांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने विविध योजना आखणे व त्या कार्यान्वीत करणे.

(च) माजी सैनिकासाठी स्थापन करण्यात येणारे सदर महामंडळ मेस्को (MESCO) सैनिक कल्याण विभागाच्या यंत्रणेव्यतिरिक्त स्वतंत्रपणे परंतु सैनिककल्याण विभागाच्या यंत्रणेशी समन्वय राखून काम करील.

## महामंडळाची  रचना

३.	या महामंडळाचे मुख्यालय पुणे येथे आहे. याच्या संचालकाचे काम  उप-सचिव (सैनिक कल्याण) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय  हे व्यवस्थापकीय संचालक  म्हणून पहातात. सुरवातीला २००३ मध्ये एक महाव्यावस्थापक, दोन व्यवस्थापक व चार-पाच लिपीक यांनी पुणे येथे सुमारे ३०० माजी सैनिक कर्मचारी घेऊन बी. एस. एन. एल. पुणे यांना कंत्राटी तत्वावर सुरक्षासेवा पुरविल्या. त्यानंतर गेल्या १८ वर्षामध्ये सुरक्षेच्या व्यतिरिक्त इतर काही क्षेत्रामध्ये पदार्पण  करून मेस्कोचा विस्तार वाढविला. आजमितीस मेस्कोमध्ये ३३ अधिकारी, १० सहाय्क सुरक्षा अधिकारी, ५६ पर्यवेक्षक, ०८ वसुली पर्यवेक्षक, ६३ लिपीक, १९ वाहन चालक, ०९ दप्तरी, व इतर ४१  (एकुण २३९) इतके अधिकारी/कर्मचारी वर्ग मेस्कोच्या विविध क्षेत्रातील कार्यभार सांभाळतात. सध्या मेस्कोव्दारा सुमारे १०,००० माजी सैनिकांना कंत्राटी तत्वावर शक्यतो त्यांच्या गावांजवळ नोकऱ्या दिलेल्या आहेत. सोबत मेस्कोच्या रचनेचा तक्ता परिशिष्ट **“अ’**   प्रमाणे जोडला आहे.

## मेस्कोची ध्येय धोरणे

४.	मेस्काची ध्येय धोरणे खाली नमुद केलेप्रमाणे आहेत :-

(क)	शारिरीकदृष्टया कणखर, मानसिक दृष्टया खंबीर, शिस्तबध्द व पुर्णत: व्यावसायिकरित्या कार्यक्षम माजी सैनिकांचे पुनर्वसन करतानाच त्यातून सार्वजनिक, खाजगी आणि शासकीय संस्थांना  सर्वोत्कृष्ट दर्जाची सुरक्षासेवा पुरविणे.

(ख)	या माजी सैनिकांना त्यांच्या निवासस्थानाजवळ अथवा त्यांच्याच जिल्हयामध्ये जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून देणे. हे महामंडळाचे प्रमुख उद्दीष्ट आहे.

(ग)	मेस्कोच्या नफयाची अंशत: रक्कम ध्वजदिन निधीमध्ये जमाकरणे. हा निधी सुध्दा विधवा, युध्दात अपंग झालेले सैनिक, माजीसैनिक व त्यांच्या पाल्यांकरिता कल्याणकारी योजनासाठी आणि पुनर्वसनासाठी उपयोगात आणला जातो.

## महामंडळाची सेवा व कार्यक्षेत्र

५.	**कंत्राटी सुरक्षा सेवा.**

(क)	वर्तमानकाळ तसेच भविष्यकाळातील सर्व प्रकारच्या धोक्याची पूर्वकल्पना आस्थापनांना देणे, त्यासाठी आवश्यक ती सर्वोच्च सुरक्षा प्रदान करणे.

(ख)	सुरक्षा व्यवस्थेच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे.

६. **प्रशिक्षण.** विविध करिअर्सच्या तयारी साठी प्रशिक्षण केंद्रे, बुलडाणा व सातारा येथे सुरू केलेली आहेत.या केंद्रामध्ये विविध क्षेत्रातील स्पर्धात्मक परिक्षा, सैन्य व पोलीस दलांमध्ये प्रवेशासाठी भरतीपुर्व प्रशिक्षण, यु.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी. परिक्षा पुर्व तयारी, एन. डी.ए./ओ.टी.ए. साठी सी.डी.एस. व एस.एस.बी. इंटरव्ह्यु, सुरक्षा सेवा, व्यक्तिमत्व विकास, इ. चे उत्कृष्ट दर्जाचे प्रशिक्षण दिले जाते. या केंद्रांमध्ये १०० प्रशिक्षणार्थ्यांसाठी राहाण्याची, भोजनाची व प्रशिक्षणाची सोय केलेली आहे.

७. **पेट्रोल पंप चालविणे.** मालाड मुंबई येथे मेस्कोद्वारा एक पेट्रोलपंप चालविण्यात येतो.

८. **संगणक प्रशिक्षण केंद्र.** सातारा येथे संगणक प्रशिक्षण केंद्रे चालविली जातात. येथे निरनिराळया सॉफटवेअर कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जाते.

९. **महासैनिक औद्योगिक वसाहत.** पिंपरी-चिंचवड एम. आय. डी.सी. मध्ये ऑटो इंजिनियरींग योजनेमध्ये माजीसैनिक उद्योजकांना आपले तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी संधि.

## महामंडळाची बलस्थाने

१०. माजीसैनिकांच्या कल्याणसाठी आणि पुनर्वसनासाठी कार्यरत राज्य शासनाचा अंगिकृत उपक्रम.

११. शासकीय कंपनी म्हणून अधिकृत नोंदणी.

१२. डारेक्टर जनरल (पुनर्वसन - डी. जी. आर.), रक्षा मंत्रालय (केंद्र सरकार) यांच्याशी अधिकृतरित्या निगडीत.

१३. महाराष्ट्र राज्य शासन निर्णय, क्र. मासैम-१०१९/२३९०/प्र.क्र. २४४/९९/२८ दि. १४ नोव्हेंबर २००२ अन्वये सर्व सरकारी, निमसरकारी, सहकारी संस्था, नगरपालिका, स्वायत्त संस्था यांनी महामंडळाकडून विनानिविदा सुरक्षा सेवा घेण्यास शासनाची अधिकृत अनुमती.

१४. केंद्रशासीत सार्वजनिक विभाग तसेच त्यांच्या राज्यस्तरीय विभागांना डि.जी.आर. केंद्रिय खात्याच्या प्रायोजकत्वाशिवायही मेस्कोची सुरक्षा यंत्रणा घेण्यास अनुमती.

१५. कामगार विषयक सर्व कायद्यांचे अत्यंत काटेकोर पालन करण्यारे महामंडळ (उदा. किमान वेतन कायदा, ई.एस. आय., ई. पी.एफ., एच. आर. ए., डब्लू, सी, ए., ग्रॉज्युईटी, बोनस, इ. ) आणि या योजनांचा माजी सैनिकांना फायदा तसेच आमच्या ग्राहकांना कायदेशीररित्या सुरक्षा देणे.

१६. शिस्त, प्रामाणिकपणा, गुणवत्तापूर्णसेवा, त्याग आणि संपूर्ण पारदर्शक व्यवहार या बाण्यानुसार महामंडळाचे कार्य अखंड सुरू आहे.

## मेस्कोची आजवरची वाटचाल

१७. आजवर महाराष्ट्राच्या सर्व ३५ जिल्हयांतील ४६० प्रतिष्ठित कंपन्या / ग्राहकांना मेस्को तर्फे १०००५ माजी सैनिकांना नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत.

१८. मुंबईत एक पेट्रोलपंप चालविण्यात येतो.

१९. सातारा येथे स्वत:ची संपूर्ण संगणकीकृत कारगिल ऑफसेट प्रिंटिंग प्रेस कार्यरत आहे, तेथे सर्व प्रकारच्या दर्जेदार छपाईची कामे होतात.

२०. महाराष्ट्र राज्यातील युवकांना सैनिक तथा पोलीस भरतीसाठी उपयुक्त ठरणारे प्रशिक्षण शिबीर केंद्र सातारा येथे यशस्वीपणे चालविण्यात येत असून सदर केंद्रातुन आजवर ११६६७ युवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

२१. ६३४४ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी, पुणे, सातारा आणि अहमदनगर येथील संगणक प्रशिक्षण केद्रातुन प्रशिक्षण यशस्वीरीत्या पुर्ण केले आहे.

२२. पर्जन्यवृष्टीतील पाण्याचे पुनर्भरण (रेन हार्वेस्टिंग) चे एकुण ४ प्रकल्प कार्यान्वीत केलेले आहेत.

## महत्वाचे शासन निर्णय

२३. महाराष्ट्र शासनाने खालीलप्रमाणे दोन शासन निर्णय प्रसिध्द करून मेस्कोला प्रोत्साहन दिलेले आहे :-

(क) सर्व प्रकारच्या शासकीय व निमशासकीय संस्थांना विना निविदा मेस्कोकडून सुरक्षा सेवा घेण्यासाठी शासन निर्णय क्र. मासैम-१०१९/२३९०/प्र.क्र. २४४/९९/२८ दि. १४ नोव्हेंबर, २००२.

(ख) माजी सैनिकांच्या पाल्यांना मेस्कोच्या सर्व उपक्रमामध्ये नोकरी देण्यासाठी शासन निर्णय क्र. मासैनो-२०१९/प्र.क्र.२००/का. २८ दि. १७ जूलै, २०१९.

## मेस्कोची वेबसाईट

२४. या महामंडळाची **www.mescoltd.co.in** हि वेबसाईट सुरू करण्यात आलेली आहे. या वेब साईटवर आपणास मेस्कोची आद्यावत माहिती मिळु शकेल.

# भाग २ नागरिकांची सनद
## मेस्कोच्या प्रशासनाविषयी आवश्यक माहिती

| अ. क्र. | विषय | हाताळणारा विभाग | आवश्यक कागदपत्रे | जबाबदार कार्यालय/अधिकारी | सहाय्यक माहिती अधिकारी (अडचण निवारण न झाल्यास ज्यांच्याकडे तक्रार करतायेईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक | माहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरक्षा सेवेत नोकरी | कार्मिक विभाग, मु. का. भरती कक्ष, मु. का, विभागीय कार्या | भरती साठी कागदपत्रे (Bio Data form, Disch Book, ESM I/Card, Gun Lic , PPO, Photo) | क्षेत्रीय व्यवस्थापक (पुणे, नागपुर, सांगली, सोलापुर, औरंगाबाद, लातुर, नाशिक व अमरावती) | श्री नितीन सुळके सहायक व्यवस्थापक मानव संसाधन व प्रशासन (९१६८३०५५८८) | ले. कर्नल रविंद्र देवभानकर (नि.) व्यवस्थापक मानव संसाधन व प्रशासन (७५८८५९५९६६) | कर्नल. प्रशांत कृ. वानखडे (नि.) महाव्यवस्थापक, मेस्को (८२७५८५७९६५) |
| २. | वेतन, भत्ते व रजा रोखीकरण | वेतन विभाग मुख्य कार्यालय | हजेरी पत्रक | वेतन विभाग, मु. का., विभागीय कार्या. कमांडर के. के. क्षीरसागर (नि.) (७५८८२३७००८) | -do- | -do- | -do- |
| ३. | भविष्य निधी | भविष्य निधी विभाग, मु. का | विहित नमुन्यात अर्ज व सहाय्यक कागदपत्रे | ले. कर्नल रविंद्र देवभानकर, (नि.) व्यवस्थापक मानव संसाधन व प्रशासन (७५८८५९५९६६) | -do- | -do- | -do- |
| ४. | ग्रुप ग्रॅच्युइटी, इ.डी.एल.आय. व अपघात विमा | लेखा विभाग, मुख्य कार्यालय | विहित नमुन्यात अर्ज व सहाय्यक कागदपत्रे | श्री प्रित्येश वाघेला, व्यवस्थापक लेखा. (९४२३०६६०१७) | -do- | -do- | -do- |
| ५. | वर्कमेन कॉम्पेन्सेशन विमा | मनुष्यबळ विभाग, मुख्य कार्यालय. | विहित नमुन्यात अर्ज व सहाय्यक कागदपत्रे | ले. कर्नल रविंद्र देवभानकर, (नि.) व्यवस्थापक मानव संसाधन व प्रशासन (७५८८५९५९६६) | -do- | -do- | -do- |

# MESCO ORGANISATION

